PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Dhakati Soon
Year: 1986

Song: Sang Tu Majhach Naa
Lyricist: Sudhir Moghe

सांग तू माझाच ना
सांग तू माझाच ना
राहू कशी तुझिया विना
सांग तू माझाच ना
सांग तू माझाच

चालता वाटेवरी
हे कोवळे सुख भेटले
चालता वाटेवरी
हे कोवळे सुख भेटले
प्रीतीच्या वळणावरी
मी थांबले गुंतले
भासते उतरून खाली
स्वर्ग ये जणू पाहूणा
सांग तू माझाच ना
सांग तू माझाच ना

भेट होता एक झाले
मी नवी जग ही नवे
भेट होता एक झाले
मी नवी जग ही नवे
वाटते आले जुळूनी
जन्म जन्मीचे दुवे
जीवना लागे किनारा
स्वप्न लाभे लोचना
सांग तू माझाच ना
सांग तू माझाच ना

हात हाती गुंफिलेले
ना कधी सोडायचे
एक नाते जोडीले ते
ना कधी तोडायचे
हात हाती गुंफिलेले
ना कधी सोडायचे
एक नाते जोडीले ते
ना कधी तोडायचे
दूर नाही जायचे
स्वप्नातही मनमोहना
सांग तू माझाच ना
राहू कशी तुझिया विना
सांग तू माझाच ना
सांग तू माझाच ना

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*